**महाराष्ट्र शासन**
**धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,**
**मुंबई यांचे कार्यालय**

धर्मादाय आयुक्त भवन,
३रा मजला, ८३, डॉ. ॲनी बेझंट रोड,
वरळी, मुंबई ४०० ०१८.
दूरध्वनी क्रमांक २४९३५४३४ २४९३५४९०
२४९३०४९९ २४९३५५१६
फॅक्स २४९७६४२०, २४९३०४९९

Office of the
CHARITY COMMISSIONER
3rd Floor, 83, Dr. Annie Besant, Rd
Worli, Mumbai - 400 018.
Tel No. 24935434 24935490 24935516
Fax No. 24976420

Email Id:- Budget.mum-mh@gov.in
Website Address :-https://charity.maharashtra.gov.in

---

संदर्भ क्रमांक: अंदाज /अलेप/ ७६०२ /२०१८ दिनांक - 10 AUG 2018

वाचा - अलेप नेमणूक/३३(२)/४.५.१९५३
१. परिपत्रक क्र. ३५७ /१२ दि. १४.०९.२०१२
२. आदेश क्रमांक ३७८ /१७ दिनांक ६/४/१६
३. आदेश क्रमांक ४४३ /१७ दिनांक १२.६.१७

**आदेश क्र.** ५७८ **दि.** १०/०८/२०१८

मुंबई सार्वजनिक विश्वस्त प्रशासन व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम ३३(२) च्या अनुषंगाने अधिकृत लेखापरिक्षक नविन नियुक्ती / फेर नियुक्तीचे आदेश देताना आवश्यक अटी व शर्ती बाबतचे उपरोक्त संदर्भीय आदेश वेळोवेळी धर्मादाय आयुक्त, महाराष्ट्र राज्य यांनी निर्गमीत केलेले आहेत.

सदर आदेशान्वये उपरोक्त नमुद संदर्भीय अटी व शर्ती एकाच आदेशात अंर्तभुत करण्यात येत आहेत.

अधिकृत लेखा परिक्षका साठी अर्जाचा विहीत नमुन्यातीलच अर्ज स्विकारावा. सदर अर्जाचा नमुना संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. तसेच नियुक्ती व फेरनियुक्ती दोन्ही करीता अर्जदाराचे कोणत्याही न्यासाशी अथवा विश्वस्तांशी हितसंबंध नसणे व न ठेवणेबाबत विहित नमुन्यात रु. १००/- किंमतीच्या मुद्रांकावर (स्टॅम्प पेपरवर) विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र नोटरी करुन घेणे बंधनकारक राहील. या बाबत संबंधीतांस माहीती देण्यात यावी.

तसेच विभागीय कार्यालयांनी त्यांचे स्तरावर सोबत जोडलेल्या अटी व शर्तीनुसार कागदपत्राची पुर्तता करुन घ्यावी. आपले कार्यालयांचे अभिप्रायासह परिपुर्ण अर्जच कार्यवाहीस्तव मुख्यालयास पाठविण्यात यावेत. कागदपत्राची पुर्तता करु न शकणारे अर्ज मुख्यालयास सादर करु नयेत. जेणेकरुन वेळेचा अपव्यय होणार नाही.

तथापी माझे असे निदर्शनास आले आहे की, अधिकृत लेखापरिक्षक म्हणून फेरनियुक्तीसाठी अर्ज करताना संबंधीत अर्जदाराने त्याचे ५ वर्षाचे कालावधीत ज्या न्यासांचे

लेखा परिक्षण केले असेल त्याची जिल्हा निहाय यादी जोडणे अनिवार्य आहे व ती यादी संबंधीत जिल्हयाचे सह धर्मादाय आयुक्त/ धर्मादाय उप आयुक्त / सहायक धर्मादाय आयुक्त यांचे कडून प्रमाणित करुनच मुख्यालयास पाठविणे बंधनकारक कण्यात आले आहे. परंतु सदर यादी संबंधीत जिल्हा कार्यालयाकडून अभिप्रायासह स्वांक्षांकीत करुन येत नाही. त्यामुळे फेरनियुक्तीसाठी आलेल्या अर्जावर पुढिल योग्य ती कार्यवाही करता येत नाही व पर्यायाने प्राप्त प्रस्ताव आक्षेप लावून परत पाठवावा लागतो. ही बाब अतिशय गंभीर आहे. जिल्हा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालयाने सदर यादीची सत्यता पडताळून प्रमाणित करुन दिल्यास फेरनियुक्ती ची प्रकरणे त्वरेने निकाली काढणे शक्य होईल.

सदर आदेश निर्गमीत झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील. उपरोक्त आदेश, अटी शर्ती, अर्जाचा नमुना तसेच प्रतिज्ञापत्राचा नमुना सर्व जिल्हा व विभागीय कार्यालयांनी त्यांच्या अधिनस्त अधिकृत लेखापरिक्षकांच्या निदर्शनास आणावे व सूचना फलकावर लावावे. तसेच सदर आदेश **https://charity.maharashtra.gov.in** संकेतांकस्थळावर उपलब्ध आहे. व त्यानुसारच अधिकृत लेखापरिक्षक नवीन नियुक्ती व फेरनियुक्ती चे प्रस्ताव सादर करावेत.

**(शि.ग. डिगे)**
**धर्मादाय आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

प्रति,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय (सर्व जिल्हे)
कार्यालयीन आदेश धारिणी
संगणक शाखा मुख्यालय सदर आदेशाची प्रत संकतांकस्थळावर प्रदर्शीत करावी.

**नविन अधिकृत लेखापरिक्षक नियुक्तीसाठीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.**

१ सोबत जोडलेला विहीत नमुन्यातील अर्ज दिनांक व साक्षरीसह असावा.(विहीत नमुना संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)

२ अर्जावर स्वतःचा फोटो व रु. १०/- चा न्यायालयीन मुद्रांक लावलेला असावा.

३ अर्जदाराचे कोणत्याही न्यासाशी अथवा विश्वस्तांशी हितसंबंध नसणे व न ठेवणेबाबत विहित नमुन्यात रु. १००/- किंमतीच्या मुद्रांकावर (स्टॅम्प पेपरवर) विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र नोटरी करुन अर्जासोबत सादर करावे.

४ पत्ता पुरावा जोडावा ( मागील महिन्याचे विद्युत देयक, दुरध्वनी देयक, गॅस देयक, वाहन चालक परवाना, पासपोर्ट यापैकी एकाची छायांकित प्रमाणित प्रत.)

५ अर्जासोबतच्या प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती ज्या कार्यालयामार्फत अर्ज सादर करण्यात येईल त्या कार्यालयाचे **धर्मादाय सह आयुक्त/सहायक धर्मादाय आयुक्त सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय यांनी साक्षांकित केलेल्या असाव्यात.**

६ ज्या कार्यालयामार्फत अर्ज सादर करण्यात येईल त्या कार्यालयाचे धर्मादाय सह आयुक्त/सहायक धर्मादाय आयुक्त यांनी **त्यांचे अभिप्रायासह** अर्ज मुख्यालयास सादर करणे आवश्यक आहे.

७ लेखा शास्त्र (Accountancy )व लेखा परिक्षण शास्त्र (Auditing)हे विषय घेवून बी कॉम पदवी परिक्षा उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्राची व गुणपत्रिका यांच्या प्रमाणित छायांकित प्रती अर्जासोबत जोडण्यात याव्यात. तसेच सदर पदवी प्राप्त केल्यानंतर सनदी लेखापालांकडे **कमीत कमी पाच वर्षे काम केल्याचे मुळ प्रमाणपत्र** अर्जासोबत सादर करावे. त्यावर पाच वर्षे अनुभवाच्या दाखलयामध्ये त्या व्यक्तीने सनदी लेखपालाच्या वतीने कोणकोणत्या संस्थेचे लेखा परिक्षण केले याबाबतचा उल्लेख असावा.

८ जे अर्जदार बी.कॉम/एम.कॉम पदवी परिक्षा व्यतिरिक्त अन्य पदवी/पदविका उत्तीर्ण झाले असल्यास त्यांनी महाराष्ट्र शासनाच्या सहकार व लेखा शास्त्रातील पदवीका परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे ( **जी.डी.सी. ॲण्ड ए.) प्रमाणपत्र व गुणपत्रिका ची प्रमाणित छायांकित प्रत** अर्जासोबत जोडावी. तसेच सदर पदवी/पदवीका प्राप्त केल्यानंतर सनदी लेखापालांकडे कमीत कमी पाच वर्षे काम केल्याचे मुळ प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करावे. त्यावर पाच वर्षे अनुभवाच्या दाखलयामध्ये त्या व्यक्तीने सनदी लेखपालाच्या वतीने कोणकोणत्या संस्थेचे लेखा परिक्षण केले याबाबतचा उल्लेख असावा.

९ अधिकृत लेखा परिक्षकांचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राहिल.

१० अधिकृत लेखा परिक्षकांची मुदत पाच वर्ष राहिल.

११ अधिकृत लेखा परिक्षकांची नियुक्ती / फेरनियुक्ती प्रक्रीया शुल्क रु. २०००/- राहिल.

१२ सर्व जिल्हा कार्यालयांचे लेखापरिक्षणासंदर्भात केलेल्या कामाचे अहवाल फेरनियुक्ती प्रस्तावासोबत जोडण्याची जबाबदारी अधिकृत लेखा परिक्षकाची राहिल.

१३ अधिकृत लेखा परिक्षकांनी लेखापरिक्षण अहवाल/पत्रव्यवहार **"अधिकृत लेखा परिक्षक"** या पदनामानेच करणे बंधनकारक राहील.

१४ अधिकृत लेखा परिक्षकाचे वास्तव्य ज्या जिल्हयात असेल त्या जिल्हा कार्यालयामार्फत

नियुक्ती /फेरनियुक्तीचा प्रस्ताव सादर करण्यात यावा.

१५ अर्जदार शासनाच्या **सहकार विभागातून सेवानिवृत्त** झाला असेल तर शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाल्याबाबत संबंधित विभाग प्रमुखाचे आदेशाची प्रमाणित केलेली सत्यप्रत लेखा परिक्षणाच्या अनुभवाबाबत त्याच विभाग प्रमुखांनी दिलेले अनुभवाचे मूळ प्रमाणपत्र प्रमाणपत्रात अनुभवाचा कालावधी तारीखवार नमूद केलेला असावा.

16 ज्या ज्या प्रमाणपत्रांच्या प्रमाणित सत्य प्रती पाठवाव्यात असा उल्लेख केला आहे, ती ती प्रमाणपत्रे निवासी जिल्हयाच्या धर्मादाय सह आयुक्त, धर्मादाय उप आयुक्त , सहायक धर्मादाय आयुक्त, सहायक लेखा संचालक, सहायक लेखा अधिकारी यांना मुळ प्रमाणपत्रे दाखवून प्रमाणित केलेल्या प्रती ग्राहय धरण्यात येतील. **अन्य प्राधिका-याकडून प्रमाणित केलेल्या प्रती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी.**

10/8/18

**(शि.गं. डिगे)**
**धर्मादाय आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**अधिकृत लेखापरिक्षक फेरनियुक्तीसाठीच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.**

१ सोबत जोडलेला विहीत नमुन्यातील अर्ज दिनांक व साक्षरीसह असावा.(विहीत नमुना संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)

२ अर्जावर स्वःताचा फोटो व रु. १०/- चा न्यायालयीन मुद्रांक लावलेला असावा.

३ उमेदवारांने कोणत्याही न्यासाशी अथवा विश्वस्तांशी हितसंबंध नसणे व न ठेवणेबाबत विहित नमुन्यात रु. १००/- किंमतीच्या मुद्रांकावर (स्टॅम्प पेपरवर) विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र नोटरी करुन अर्जासोबत सादर करावे.

४ पत्ता पुरावा जोडावा ( मागील महिन्याचे विद्युत देयक, दुरध्वनी देयक, गॅस देयक, वाहन चालक परवाना, पासपोर्ट यापैकी एकाची छायांकित प्रमाणित प्रत.)

५ मागिल पाच वर्षात लेखा परिक्षण करुन दाखल केलेल्या न्यासांची यादी जिल्हा निहाय जोडावी. त्यात न्यासाचे नाव , पत्ता, नोंदणी क्रमांक , लेखा परिक्षण वर्ष नमुद करावे. जिल्हानिहाय न्यासांची यादी संबंधीत जिल्हयाचे **धर्मादाय सह आयुक्त/धर्मादाय उपआयुक्त /सहायक धर्मादाय आयुक्त सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय यांचेकडून प्रमाणीत करुन त्यांचे अभिप्रायासह असावी.**

६ **मुख्यालयाने दिलेले मुळ ओळखपत्र व मुळ आदेशाचे प्रती मुदत संपल्यानंतर अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.**

७ अर्जासोबतच्या प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती ज्या कार्यालयामार्फत अर्ज सादर करण्यात येईल त्या कार्यालयाचे **धर्मादाय सह आयुक्त/सहायक धर्मादाय आयुक्त सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय यांनी साक्षांकित केलेल्या असाव्यात.**

८ **अर्ज निवासी जिल्हाचे कार्यालयामार्फत सादर करण्यात येईल त्या कार्यालयाचे धर्मादाय सह आयुक्त/सहायक धर्मादाय आयुक्त यांनी त्यांचे अभिप्रायासह अर्ज मुख्यालयास सादर करणे आवश्यक आहे.**

९ अधिकृत लेखा परिक्षकांचे कार्यक्षेत्र संपूर्ण महाराष्ट्र राहिल.

१० अधिकृत लेखा परिक्षकांची मुदत पाच वर्ष राहिल.

११ अधिकृत लेखा परिक्षकांची नियुक्ती / फेरनियुक्ती प्रक्रीया शुल्क रु. २०००/- राहिल.

१२ सर्व जिल्हा कार्यालयांचे लेखापरिक्षणासंदर्भात केलेल्या कामाचे अहवाल फेरनियुक्ती प्रस्तावासोबत जोडण्याची जबाबदारी अधिकृत लेखा परिक्षकाची राहिल.

१३ अधिकृत लेखा परिक्षकांनी लेखापरिक्षण अहवाल/पत्रव्यवहार "**अधिकृत लेखा परिक्षक**" या पदनामानेच करणे बंधनकारक राहील.

**(शि.ग. डिगे)**
**धर्मादाय आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

| येथे रुपये १० चा न्यायालय फी मुद्रांक चिकटवावा | फोटो |
|---|---|

प्रति
मा. धर्मादाय आयुक्त
धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय
वरळी मुंबई

मार्फत
धर्मादाय सहआयुक्त
विभागाचे नाव

**विषय - अधिकृत लेखापरिक्षक म्हणून नविन नियुक्ती / फेर नियुक्ती मिळणेबाबत**

महोदय,

महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० कलम ३३(२) अंतर्गत मी अधिकृत लेखापरिक्षक म्हणुन काम करण्यास इच्छुक आहे. तरी मला अधिकृत लेखापरिक्षक म्हणून नेमणूक मिळावी ही विनंती. माझी माहिती खालील प्रमाणे आहे.

**१ वैयक्तीक माहीती**

संपूर्ण नाव ----------------------------------------

संपूर्ण पत्ता ---------------------------------------- वास्तव्याचा पुरावा (नमुद करावा व जोडावा)

निवासी जिल्हा ---------- पिन कोड --------

जन्म तारीख ---------- लिंग --------

मोबाईल क्रमांक ---------- ई मेल --------

आधार क्रमांक -----------

नियुक्ती प्रकार नवीन नियुक्ती / फेर नियुक्ती

धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य

## २ शैक्षणिक पात्रता

| अ क्र | शैक्षणिक पात्रता | शाखा | विदयापीठ | वर्ष | विषय | गुणपत्रिका | प्रमाणपत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | स्वाक्षांकीत प्रती सोबत जोडणे आवश्यक | |
| १ | पदवी | | | | | | |
| २ | पदवीका | | | | | | |
| ३ | जी डी सी& ए | | | | | | |
| ४ | पदव्युत्तर पदवी | | | | | | |

**३. अनुभव** (सनदी लेखापरिक्षका कडे कमीतकमी ५ वर्ष काम केल्याचा मुळ अनुभव प्रमाणपत्र जोडणे आवश्यक )

| अ क्र | सनदी लेखापालमार्फत लेखापरिक्षण केलेल्या संस्था | लेखापरिक्षण केलेला कालावधी | संस्था नोंदणी क्रमांक | अनुभवाचा कालावधी | |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |

**४.फेर नियुक्ती असल्यास** (नवीन नियुक्तीस लागू नाही)

मुळ नियुक्तीची तारीख व आदेश क्रमांक -------- ---------- --------

चालू नियुक्तीचा कालावधी -------- ---------- --------

मुळ आदेश व ओळखपत्र जोडणे आवश्यक मुळ प्रती जोडल्या आहेत / नाहीत

मागील तीन वर्षात लेखा परिक्षण करुन दाखल केलेल्या न्यासांची यादी त्या जिल्हयाचे धर्मादाय सह आयुक्त / धर्मादाय सहायक आयुक्त सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालया यांच्या कडून प्रमाणीत करुन घ्यावी. (प्रमाणीत यादी जोडावी)

| अ क्र | न्यासाचे नाव | पत्ता | संस्था नोंदणी क्रमांक | लेखापरिक्षण केलेला कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |

आपला विश्वासू

दिनांक

अर्जदाराची स्वाक्षरी

**कार्यालयीन वापरासाठी**

**प्रति,**
मा. धर्मादाय आयुक्त
महाराष्ट्र राज्य , मुंबई

**विषय - अधिकृत लेखापरिक्षक नियुक्ती / फेरनियुक्ती प्रस्ताव सादर करणे बाबत**

महोदय,

अर्जदार श्री / श्रीमती ---------------------------------------------------------- विभागाचे नाव --------- यांचे अर्जाची पुर्ण तपासणी करण्यात आली आहे. तसेच अर्जासोबत जोडण्यात आलेले छायांकीत प्रती मुळ प्रमाणपत्रे तपासून स्वाक्षांकीत करण्यात आलेली आहेत. तसेच अधिकृत लेखापरिक्षकाचे नियुक्ती / फेरनियुक्तीस लागू असण्या-या सर्व अटी व शर्तीची पुर्तता केलेली आहे. सदर अर्जदारास अधिकृत लेखापरिक्षकाचे नियुक्ती / फेरनियुक्ती करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

आपला विश्वासू

विभाग प्रमुख स्वाक्षरी व शिक्का

सोबत जोडले आहे.

१ विहीत नमुन्यातील अर्ज
२ विहीत नमुन्यात प्रतिज्ञापत्र
३ पत्ता पुरावा. (मागील महिन्याचे विदयुत देयक/ दुरध्वनी देयक/ गॅस देयक/ पासपोर्ट/ वाहनचालक परवाना) पैकी एकाची स्वाक्षांकीत प्रमाणीत प्रत
४ गुणपत्रिका व प्रमाणपत्रा च्या छायांकीत प्रती त्या जिल्हयाचे धर्मादाय सह आयुक्त / धर्मादाय उप आयुक्त / धर्मादाय सहायक आयुक्त सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालया यांच्या कडून प्रमाणीत करुन घ्यावी. अन्य प्राधिका-याकडून प्रमाणित केलेल्या प्रती विचारात घेतल्या जाणार नाहीत.
५ पदवी ,पदवीका, पदव्युत्तर पदवी प्राप्त केल्यानंतर सनदी लेखापालाकडे कमीत कमी ५ वर्षे काम केल्याचे मुळ अनुभव प्रमाणपत्र
६ विवाहीत महिलांचे नाव बदलले असल्यास त्याबाबतचे राजपत्र
७ लेखा परिक्षण केलेल्या न्यासाची जिल्हा निहाय प्रमाणीत यादी

धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य

(रु. १००/- किंमतीच्या मुद्रांकावर (स्टॅम्प पेपरवर) विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्र नोटरी )

## प्रतिज्ञा पत्र

मी ...................................... वय ........ धंदा व्यवयास, राहणार ..........................................................................................................

सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

मी मा.धर्मादाय, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे कार्यालयात १९५० चे विश्वस्थ व्यवस्था अधिनियमाचे कलाम ३३(२) मधील तरतुदीनुसार अधिकृत लेखा परिक्षक म्हणून मान्यता मिळणेबाबत अर्ज दाखल करत आहे. त्या संदर्भात मी प्रतिज्ञेवर लिहून देतो की, बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ऍक्ट १९५०, अंतर्गत नोंदणी झालेल्या कोणत्याही न्यासाशी अथवा विश्वस्थांशी माझो प्रत्यक्ष संबंध अथवा हितसंबध नाहीत तसेच भविष्यातही ठेवणार नाही.

तसेच पुढे लिहून देतो की, या प्रकरणी दाखल केलेली प्रमाणपत्रे , कागदपत्रे व निवेदने या विषयी भविष्यात काही वाद निर्माण झाल्यास त्याकरिता मी पूर्णपणे जबाबदार राहीन व त्या संबंधी कायदेशीर कार्यवाही स पात्र राहीन.

मी हे प्रतिज्ञापत्र आज दिनांक ............... रोजी सत्यप्रतिज्ञेवर लिहून देत आहे.

सदर प्रतिज्ञापत्रात नमुद केलेली माहिती संपूर्ण खरी व बरोबर आहे. भविष्यात खोटी अगर बनावट आढूळन आल्यास मी भा. द. वि. १९९,१९३/३,२०० प्रमाणे शिक्षेस व दंडास मी वैयक्तीकरित्या पात्र राहीन.

प्रतिज्ञापत्र करणारा

(                    )

पत्ताः-

BEFORE ME

NOTARY